शिक्षण विभाग (प्राथमिक),जिल्हा परिषद,नागपूर,

# जाहीर सुचना

अनुसूचित जमाती प्रवर्गातील सरळ सेवेची शिक्षण सेवक संवर्गाची पदभरती प्रक्रियेबाबत

यासोबत उमेदवारांकडून प्राप्त अर्ज व आक्षेपानुसार छाननी अंती निवडीसाठी पात्र उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तसेच

निवडीसाठी पात्र उमेदवारांच्या अतिम यादीतील उमेदवारांपैकी मुळ दस्ताऐवज तपासणीसाठी बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांनी यादी प्रसिद्ध करण्यात येत असुन सदर यादीतील उमेदवारांनी **दिनांक - ०५.०२.२०२० रोजी स. १०.०० वा** न-चुकता खालील मुळ दस्ताऐवज तपासणी करीता शिक्षण विभाग (प्राथमिक),जिल्हा परिषद,नागपूर कार्यालयास उपस्थित राहीवे.

अर्जदारांनी मुळ दस्ताऐवज पडताळणी दरम्यान खालील प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१) अर्जाची प्रत
२) शाळा/महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र
३) शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र (गुणपत्रिका) १० वी/१२ वी/पदविधर/पदवित्तर
४) व्यवसासिक अर्हता (D.Ed/B.Ed.)
५) पदास आवश्यक असलेले प्रमाणपत्र व गुणपत्रिका (TET/CTET व TAIT)
६) वयासबंधी दाखला (जन्माचा दाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र)
७) जातीचे प्रमाणपत्र
८) जात वैधता प्रमाणपत्र
९) अधिवास प्रमाणपत्र (एस.डी.ओ./उप जिल्हाधिकारी यांनी दिलेले)
१०) नि:समर्थ/भुकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त/माजी सैनिक/अंशकालीन बेरोजगार कर्मचारी/१९९९ चे जनगणना कर्मचारी/स्वातंत्र संग्राम सैनिकांचे पाल्य बाबत प्रमाणपत्र/अनाथ असल्यास प्रमाणपत्र
११) अनुभव प्रमाणपत्र - संस्थेचा शिक्का व सही तसेच जावक क्रमांकासह स्पष्ट स्वरुपात असावे.
१२) खेळाडूचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकाऱ्याचे.
१३) शासकिय/निमशासकिय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेतल्याचे प्रमाणपत्र
१४) सेवायोजन कार्यालयात नांव नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र.
१५) छोटे कुंटूंब असल्याबाबतचे प्रमाणपत्र.
१६) नियुक्ती करीता निवड झाल्यानंतर बंधपत्र भरुन देणे बंधनकारक राहील.

निवडीसाठी पात्र उमेदवारांच्या अंतिम यादीतील उमेदवारांपैकी मुळ दस्ताऐवज तपासणीसाठी बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांनी मुळ दस्ताऐवज पडताळणी दरम्यान उक्त प्रमाणपत्र न-चुकता सादर करावे. सदर प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय आपली निवड केली जाणार नाही तसेच प्रमाणपत्र सादर करण्याकरीता कुठलीही अतिरिक्त मुदत दिली जाणार नाही व अशा उमेदवारास नियुक्ती दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(मा. अध्यक्ष,जिल्हा निवड समिती,नागपूर तथा जिल्हाधिकारी,नागपूर यांचे मान्यतेनुसार)

(चिंतामण वंजारी)
सदस्य
जिल्हा निवड समिती,नागपूर
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,नागपूर

(डॉ. कमलकिशोर फुटाणे)
सदस्य/सचिव,
जिल्हा निवड समिती,नागपूर
तथा अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,नागपूर,

Scanned by CamScanner